# शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

फोन / फॅक्स नं ०२४०-२३३१४७६ E-mail: gasca1923@gmail.com Website: www.gasca.ac.in


## प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील महत्त्वाची सूचना

**शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविणार असल्यामुळे प्रवेश प्रक्रियेकरिता महाविद्यालयात प्रत्यक्ष येण्याची गरज नाही.**

शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयामध्ये ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याकरिता मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे -

१. सर्व प्रथम आपण प्रवेशासंदर्भात महाविद्यालयाचे माहितीपुस्तक काळजीपूर्वक वाचावे जे आपल्याला महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (www.gasca.ac.in) उपलब्ध आहे.

२. आपण ज्या वर्गात प्रवेश घेण्याकरिता अर्ज करणार आहात त्या वर्गासाठी विषयांची निवड आणि प्रवेश शुल्क यासंदर्भात माहिती अवगत करुन घ्या, यासंदर्भात आपल्याला काही शंका असल्यास महाविद्यालयातील प्रवेश सल्लागार समितीच्या सदस्यांशी आपण फोन वरुन निरसन करुन घेऊ शकता. सल्लागार समितीच्या सदस्यांची यादी फोन नंबरसहित माहितीपुस्तकात उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे ज्या वर्गाला आपण प्रवेश घेण्यास इच्छूक असाल त्या वर्गाच्या प्रवेश समिती सदस्यांची यादी देखिल फोन नंबर सहित माहितीपुस्तकात उपलब्ध आहे. आपण संबंधीत प्राध्यापकांना संपर्क करणे अपेक्षित आहे.

३. ऑनलाईन प्रवेश अर्ज हा गुगल फॉर्मच्या माध्यमातून भरावयाचा आहे. त्याची लिंक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर वर्गनिहाय दिलेली आहे. कृपया आपण ज्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिता त्या वर्गाचीच लिंक निवडा.

४. अर्जासोबत आपल्याला प्रवेश घेण्याऱ्या विद्यार्थ्याचा मार्कमेमो स्कॅन करुन अपलोड करावयाचा आहे. समजा स्कॅन कागदपत्र जर Sachin Patil यांचा मार्कमेमो असेल तर त्या फाईलला Sachin_Patil_MarkMemo असे नांव द्यावे. स्कॅन कागदपत्र pdf, png, jpeg, bmp या फॉरमॅट मध्ये असावे.

५. आपला प्रवेश अर्ज महाविद्यालयाकडे जमा झाल्यानंतर जर आपण प्रवेशास पात्र ठरलात तर आपल्याला स्वतःचा रंगीत फोटो, विद्यार्थ्याची आणि पालकांची स्वाक्षरी, अपंग प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, LC/TC/Migration certificate, Gap Certificate, Online allotment letter, Online admission fee receipt इत्यादींपैकी लागू असणारी कागदपत्रे स्कॅन करुन प्रवेश समितीच्या ईमेलवर पाठवायची आहेत (जी आपण गुगल फॉर्म मध्ये नोंदविलेली आहेत). प्रवेश समितीचे ई-मेल महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन त्याची एकच pdf करावी व त्याला तुमचे स्वतःचे नाव द्यावे. जोपर्यंत आपला मूळ दाखला (LC/TC) महाविद्यालयात जमा होत नाही तोपर्यंत आपला प्रवेश निश्चित होणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

६.आपला प्रवेश अर्ज महाविद्यालयात सादर केल्यानंतर प्रवेश समिती आपल्या प्रवेश अर्जाची पडताळणी करुन पात्र असल्यास प्रवेशासंदर्भातील पुढील प्रक्रियेच्या अनुषंगाने आपल्या अर्जामध्ये दाखल केलेल्या फोन नंबरवर/ई-मेलवर संपर्क साधणार आहे. तसेच महाविद्यालय मा. महाराष्ट्र शासन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व उच्च माध्यमिक मंडळ, यांच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशानुसार ऑनलाईन शिक्षण प्रणाली राबविणार आहे. सबब आपण अर्जामध्ये आपला Whatsapp फोन नंबर व ई-मेल अचूक नोंदवावा. काही तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्याचा संपर्क होऊ शकत नसेल तर पालकांशी संपर्क साधणे अपरिहार्य ठरेल त्यामुळे पालकांचे संपर्क क्रमांक देखिल अचूक नोंदविणे आवश्यक आहे. आपण प्रवेश अर्ज दाखल केल्यानंतर आपल्याला त्या वर्गाच्या Whatsapp ग्रुप मध्ये सामील होण्याकरिता लिंक गुगल फॉर्म प्रवेश अर्जामध्ये दिलेली आहे त्या ग्रुपला जॉईन व्हावे म्हणजे आपल्याला पुढील सर्व सूचना प्राप्त होतील.

**(डॉ. रोहिणी कुलकर्णी-पांढरे)**
**प्राचार्य**
**शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद**